# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

# प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

21/9/2022

(सुरेश गायकवाड)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र. ५१

दिनांक : २९.०९.२०२२

बेस्टची पूर्ण क्षमतेने संपूर्ण मुंबईतील पहिल्या आणि शेवटच्या टप्प्या पर्यंत ई-बाईक सेवेची घोषणा - अशी सेवा देणारा भारतातील पहिला सार्वजनिक वाहतूक उपक्रम

मुंबई, २९- मुंबई शहरासाठी एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पूर्ण क्षमतेने एकत्रित वाहतूक उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून बेस्ट उपक्रमाने आज घोषणा केली आहे.

संपूर्ण शहरात पहिल्या आणि शेवटच्या टप्पा जोडण्याच्या त्यांच्या ई-बाईक सेवा सुरू करण्यात आली आहे .

ऑक्टोबरमध्ये १८० बस थांब्यांवर , व्यावसायिक तसेच निवासी भागात १००० ई-बाईक तैनात केल्या जातील. बसमधून उतरणारे प्रवासी त्यांच्या गंतव्यस्थानावर जाण्या- येण्यासाठी ई-बाईकचा वापर करू शकतात. ई-बाईक कोणत्याही ई-बाईक स्टेशनवर घेतल्या आणि परत दिल्या जाव् शकतात. यामुळे देशातील तंत्रज्ञानाभिमुख वाहतूक उपक्रम म्हणून बेस्टचे स्थान आणखी मजबूत होईल

बेस्ट जून २०२२ पासून या सेवेच्या सार्वजनिक चाचण्या करत आहे आणि त्यांना यासाठी ४०,००० हून अधिक लोकांनी नोंदणी केल्याने प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. सुरुवातीला या ई बाइक्स अंधेरी, विलेपार्ले, जुहू, सांताक्रूझ, खार, वांद्रे, माहीम आणि दादर येथे उपलब्ध केल्या जातील आणि नंतर शहराच्या

Scanned with OKEN Scanner

उर्वरित भागांत त्यांचा विस्तार केला जाईल. जून २०२३ पर्यंत हा ताफा ५,००० ई-बाईकपर्यंत वाढणार आहे. लवकरच ही सेवा बेस्ट चलो ॲपसोबत संलग्न केली जाईल.

बेस्टनेही प्रवासाचे विशेष नियोजन केले आहे ज्यायोगे बसेस आणि ई-बाईकवरील फेऱ्या एकाच योजनेत समाविष्ट होतील . या एकात्मिक सेवेमुळे मुंबईत कोठेही प्रवास करण्यासाठी बसचा वापर करणे अधिक सोयीस्कर ठरून त्यामुळे बस प्रवासी संख्या वाढीस चालना मिळेल .

या प्रकल्पाची अंमलबजावणी 'Selection of Service Provider for Deploying E Scooters for the Last – Mile Connectivity with Buses for BEST Undertaking ' या निविदेअंतर्गत भारतातील आघाडीच्या स्वयंचलित गतिमान शेअर असलेल्या " वोगो " या भाड्याने दुचाकी वाहन देणाऱ्या संस्थेसोबत भागीदारीत करण्यात आली आहे.अशा प्रकारच्या एकात्मिक पहिल्या आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत सेवा देणारा बेस्ट ही भारतातील पहिली सार्वजनिक वाहतूक उपक्रम आहे.

**प्रवाशांसाठी मुख्य फायदे :**

१. व्यावसायिक आणि निवासी भागात प्रमुख बस थांब्यांवर अखंड आणि त्वरित संपर्क व्यवस्था .

२. अत्यंत परवडणारे भाडे – मूळ भाडे फक्त २० रु., प्रति किमी प्रवासासाठी ३ रु. आणि १.५० रु. प्रति मिनिट.

३. सुरक्षित वेग - शहरातील प्रवासांसाठी अत्यंत सुरक्षित असा २५ किमी प्रति तास पर्यंत मर्यादित आहे,

४. वायू किंवा ध्वनी प्रदूषण नाही –ई-बाईक कोणत्याही प्रकारचे वायू किंवा ध्वनी प्रदूषण करत नाहीत.

५. गर्दी कमी असलेल्या रस्त्यावरील प्रत्येकासाठी जलद प्रवास.

बेस्ट हा भारताचा पहिला तंत्रज्ञानाभिमुख परिवहन उपक्रम आहे. चलो ॲपचे लोकार्पण झाल्यापासून डिजिटल आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बेस्टने आघाडी घेतली आहे. आजपर्यंत ३० लाख वापरकर्त्यांनी ते डाउनलोड केले असून २५ टक्क्यापेक्षा जास्त बस प्रवासी आता त्याचा दररोज वापर करत आहेत. प्रत्येक

Scanned with OKEN Scanner

प्रत्येक डिजिटल फेरी बस प्रवाशांसाठी विनात्रास ,सुकर प्रवास अनुभव देते. तसेच आणि रोख हाताळणीचे आणि कागदी तिकिटाच्या खर्चाचीही बचत होते. आता, ई-बाईक संपूर्ण क्षमतेने आणणारा, बेस्ट हा भारतातील पहिला अखंड आणि एकत्रित घरोघरी जोडणारा वाहतूक उपक्रम बनला आहे.

या डिजिटल आणि तंत्रज्ञानाच्या नेतृत्वाखालील एकत्रित सेवांमुळे प्रवाशांच्या संख्यावाढीसही मदत झाली आहे. बेस्टने अलीकडेच अनेक वर्षांमध्ये दररोज ३५ लाख प्रवाशांचा आकडा पार करून दररोजच्या प्रवाशांचा उच्चांक गाठला आहे , जो कोविड पूर्व काळांपेक्षा ९ टक्क्यांनी जास्त आहे .

**<u>वोगो ई-बाईकबद्दल अधिक माहिती</u>**

वोगो ई-बाईकची वैशिष्ट्ये

**वापरण्यास सोपी :**

- कमी-शक्तीच्या ई-बाईक चालवण्यासाठी चालक परवान्याची आवश्यक नाही. ते प्रत्येकासाठी वापरण्यायोग्य आहेत.
- या ई-बाईक गियरलेस आहेत. जो कोणी सायकल चालवू शकतो तो काही मिनिटांत ती वापरायला शिकू शकतो.
- ई-बाईक अनलॉक करण्यासाठी आणि चालवण्यासाठी Vogo ॲपचा वापर करावा आणि नंतर फेरी संपल्यानंतर त्यांना पुन्हा लॉक करा.

**डिजिटल प्रदान :**

UPI, क्रेडिट आणि डेबिट कार्ड, नेट बँकिंग, मोबाईल वॉलेट या सारख्या सर्व ऑनलाइन प्रदान स्वीकारले जातील .

**अभ्यासपूर्ण रचना :**

अतिरिक्त आरामासाठी विस्तृत आसन व्यवस्था आणि Heavy duty shock absorbers.

**सुरक्षित प्रवास**

वेग २५ किमी प्रति तास पर्यंत मर्यादित असल्याने ते शहरातील प्रवासासाठी अत्यंत सुरक्षित आहे.

Scanned with OKEN Scanner

**बॅटरी सुरक्षा**

• संपूर्ण वापर आणि चार्ज सायकल दरम्यान बॅटरी सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी वोगोने अनेक खबरदाऱ्या घेतलेल्या आहेत .

• १५०० वॅट्सच्या मोटर्सला उर्जा देण्यासाठी हेवी ड्युटी बॅटरी वापरणाऱ्या इतर इलेक्ट्रिक स्कूटरच्या पेक्षा , वोगो ई-बाईक्स २५० वॅट्सच्या मोटरला उर्जा देण्यासाठी कमी-शक्तीची बॅटरी वापरते .

• बाईकस्वाराला कधीही बॅटरी चार्ज करावी लागत नाही कारण वोगो पूर्णपणे स्वयंचलित चार्जिंग प्रणाली वापरते.

• जेव्हा इलेक्ट्रिक स्कूटर आणि कार जलद चार्जिंगचा वापर करतात, ज्यामुळे बॅटरी गरम आणि खराब होऊ शकते. वोगो बॅटरीचे आरोग्य आणि सुरक्षितता राखण्यासाठी स्लो चार्जिंगचा वापर करते.

**ई-बाईक कसे वापरावे ?**

प्रथम वापरकर्ते

प्रथम वापरकर्त्यांनी वोगो ॲप डाउनलोड करून त्यांची एक वेळची ऑनलाइन नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे.

**ई-बाईकने प्रवास कसा करावा ?**

• जवळचे ई-बाइक स्थानक शोधण्यासाठी वोगो ॲप वापरा

• ॲप स्थानकावर किती बाईक उपलब्ध आहेत आणि त्यांची सध्याची बॅटरी पातळी आणि श्रेणी देखील प्रदर्शित करते.

• वापरकर्ते बाइक अनलॉक करण्यासाठी आणि प्रवास सुरू करण्यासाठी ॲप वापरू शकतात.

• ॲपचा वापर करून ते त्यांचा प्रवास थांबवू किंवा संपवू शकतात आणि ॲप वापरून ई-बाईक लॉक करू शकतात.

• प्रवासाच्या शेवटी वापरकर्त्याच्या वोगो वॉलेटमधून शुल्क प्रदान प्रक्रिया आपोआप केली जाते.

---

Scanned with OKEN Scanner

2094

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट

# प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दी करिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

मनोज वराडे 4/10/2022

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.५२
दिनांक :. ०४.१०.२०२२

## बेस्टच्या अंतर्गत वाहनांच्या ताफ्यात इलेक्ट्रिक वाहनांची भर

मुंबई, ०४ - वातावरणातील प्रदुषण कमी करण्याच्या दृष्टीकोनातून आणि इंधन तसेच मोटर वाहनांच्या खर्चात बचत करण्याच्या उद्देशाने बेस्ट उपक्रमाने अंतर्गत वाहतुकीसाठी डिझेलवर चालणा-या मोटार वाहनांऐवजी इलेक्ट्रिकवर चालणारी मोटार वाहने भाडेतत्वावर घेण्याचा निर्णय घेतला आहे.

या मोहिमेअंतर्गत एकूण ११७ इलेक्ट्रिक मोटार वाहने समाविष्ट करण्यात येणार असून त्यापैकी १६ वाहने तयार असून आज बेस्टचे महाव्यवस्थापक श्री. लोकेश चंद्र यांच्या शुभहस्ते १५ वाहनांचे उद्घाटन कुलाबा आगारात करण्यात आले. त्यावेळी बेस्टचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यापूर्वी बेस्टच्या ताफ्यात ४०० इलेक्ट्रिक बसगाड्या समाविष्ट झाल्या आहेत.

या नवीन गाडयांमुळे बेस्टच्या वार्षिक खर्चात देखील २५ टक्के बचत होईल असे मत बेस्टचे महाव्यवस्थापक श्री. लोकेश चंद्र यांनी व्यक्त केले.

........

Scanned with OKEN Scanner

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया, प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दीपत्रक क्र.५३
दिनांक : ११.१०.२०२२

**बेस्टची केवळ ९ रुपयांत ५ प्रवास फेऱ्यांचा लाभ देणारी सुपर सेव्हर दिवाळी योजना जाहीर.**

बेस्ट चलो ॲपचा प्रथमच वापर करणारे याचा लाभ घेऊ शकतात

मुंबई, मंगळवार. ११- बेस्ट उपक्रमाने डिजिटल बस प्रवासाला प्रोत्साहन देण्यासाठी दिवाळी योजना जाहीर केली असून ही एकदाच असणारी ऑफर वापरकर्त्यांना कोणत्याही मार्गावर फक्त ९रुपयांत ५ प्रवासी फेऱ्यांचा लाभ देते आणि सदर योजना ७ दिवसांसाठी ती वैध आहे. अधिकाधिक मुंबईकरांना या सुविधांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करणे हाच या योजनेचा उद्देश आहे

**<u>ऑफरचा लाभ कसा घ्यावा ?</u>**

फक्त बेस्ट चलो ॲप डाउनलोड करा आणि ॲपच्या ‘बस पास’ पर्यायात जावून ऑफर शोधा. “ दिवाळी ऑफर ” निवडल्यानंतर , तुमचा तपशील प्रविष्ट करा आणि UPI, डेबिट किंवा क्रेडिट कार्डद्वारे अथवा नेट बँकिंग इ. द्वारे ९/- रु. चा ऑनलाइन भरणा प्रदान करा.

एकदा तुम्ही बसमध्ये चढल्यानंतर, प्रवास सुरु करण्यासाठी मोबाईल मधील ' फेरी सुरू करा' असे बटण दाबा. प्रवास वैधतेसाठी तिकीट मशीनजवळ तुमचा फोन टॅप करा. यशस्वी वैधतेनंतर तुम्हाला ॲपवरच तुमच्या प्रवास फेरीची डिजिटल पावती मिळेल.

Scanned with OKEN Scanner

संपूर्ण व्यवहार हा विनारोख आणि कागदरहित असेल ! सदर योजना १२ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत प्रवाशांसाठी उपलब्ध असेल.

**<u>पात्र वापरकर्ते :-</u>**

ज्यांनी यापूर्वी कधीही बेस्ट चलो ॲपवर सुपर सेव्हर योजना किंवा डिजिटल तिकीट पूर्वी कधीच खरेदी केलेली नाही, अशा सर्व वापरकर्त्यांसाठी सदर योजना उपलब्ध आहे.

**<u>ऑफरचे फायदे :-</u>**

या योजनेनुसार जे वापरकर्ते पहिल्यांदा डिजिटल प्रदान करत आहेत ते कोणत्याही बसमार्गावर ७ दिवसांच्या कालावधीत ५ प्रवासी फेऱ्या करू शकतात. ही योजना विमानतळ मार्ग, हॉप-ऑन हॉप-ऑफ बस या विशेष बससेवा वगळून सर्व वातानुकूलित आणि विना वातानुकूलित बसेससाठी लागू असेल.

**बेस्ट ही देशातील अग्रगण्य तंत्रज्ञानाभिमुख सार्वजनिक वाहतूक उपक्रम म्हणून आपला नावलौकिक राखून आहे.**

आतापर्यंत ३० लाखांहून अधिक वापरकर्त्यांनी बेस्ट चलो ॲप डाउनलोड केले असून त्यापैकी २५% पेक्षा जास्त बस प्रवासी त्याचा दररोज वापर करीत आहेत . प्रत्येक डिजिटल बसफेरी प्रवाशांसाठी सुखद प्रवासाचा अनुभव देते, त्याबरोबरच रोख रक्कम हाताळणीचा त्रास आणि तिकीट छपाईचा खर्च वाचतो.

बेस्टने अलीकडेच ३५ लाख दैनंदिन प्रवाशांचा आकडा गाठला असून अनेक वर्षांतील सर्वात जास्त दैनंदिन प्रवासी संख्येचा उच्चांक निर्माण केलेला आहे जो कोविड पूर्व काळापेक्षा ९% ने जास्त आहे.

बेस्टने यापूर्वी स्वातंत्र्यदिनी १/- रुपयाची प्रवास योजना तसेच गणेश उत्सव , नवरात्री आणि दसरा या दिवशी विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत ज्याचा लाखो मुंबईकरांनी लाभ घेवून १२ लाखांहून अधिक डिजिटल प्रवासी फेऱ्या अनुभवल्या.

-------

Scanned with OKEN Scanner

२०७५

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

मसुवराडे
१८/१०/२०२२.
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.५४
दिनांक :१८.१०.२०२२

## दिपावलीसाठी बेस्टची अतिरिक्त बससेवा

मुंबई, १८ - दिनांक २२ ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत दीपावलीच्या निमित्ताने मुंबईतील वीर कोतवाल उद्यान (प्लाझा-दादर), वांद्रे, महात्मा फुले मार्केट, काळबादेवी, एपीएमसी मार्केट (वाशी) यासारख्या बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी लोक गर्दीने जात असतात. अशा प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्ट उपक्रमाच्यावतीने रविवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२२ ते शनिवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत विविध बसमार्गांवर २५ अतिरिक्त बसफे-या चालविण्यात येणार आहेत.

त्याचप्रमाणे बुधवार दिनांक २६ ऑक्टोबर २०२२ रोजी भाऊबीज आणि बलिप्रतिपदा (दिवाळी पाडवा )हे दोन्ही दिवस एकत्रित येत आहेत. या दिवशी संपूर्ण मुंबई शहरात विशेषत: पूर्व-पश्चिम या दोन्ही भागात, पश्चिम द्रुतगती महामार्ग, भाईंदर तसेच नवी मुंबईकडे जाणा-या बसमार्गांवर प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेऊन बेस्ट उपक्रमाने १४० अतिरिक्त बससेवा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे.

तरी प्रवाशांनी या बससेवांचा अवश्य लाभ घ्यावा,असे आवाहन बेस्ट उपक्रमाच्या वतीने करण्यात येत आहे.

......

Scanned with OKEN Scanner

२०८५

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

# प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मनोज वराडे १८/१०/२०२२
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.५५
दिनांक :१८.१०.२०२२

**यंदाची दिवाळी पहाट बेस्टच्या दुमजली बसमधून**

मुंबई, १८ - मुंबई शहरामध्ये दररोज मोठया संख्येने पर्यटक येत असतात. त्याचप्रमाणे भारतीय नागरीक देखील पर्यटनाच्या दृष्टीने मुंबईला भेट देत असतात. या सर्वांसाठी बेस्ट उपक्रमाने दिनांक ३ नोव्हेंबर २०२१ पासून दररोज सायंकाळी प्रेक्षणीय स्थळे आणि प्राचीन वास्तूंचे दर्शन घडविणारी हेरिटेज पर्यटन बससेवा सुरु केली आहे.

सदर पर्यटन बससेवा खुल्या दुमजली बसगाडीतून गेट वे ऑफ इंडिया, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मंत्रालय, विधान भवन, एन.सी.पी.ए., मरिन ड्राइव्ह, चौपाटी, चर्चगेट स्थानक, ओव्हल मैदान, राजाबाई टॉवर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई विद्यापीठ, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, हुतात्मा चौक, हॉर्निमन सर्कल, रिझर्व बँक ऑफ इंडिया, एशियाटीक लायब्ररी आणि जुने कस्टम हाऊस अशा विविध स्थळांचे दर्शन घडविते.

सुरुवातीला सायंकाळी ६.३० आणि रात्री ८.०० वाजता गेट वे ऑफ इंडिया येथून दोन बसफे-या शनिवार आणि रविवार यादिवशी प्रवर्तित करण्यात येणारी ही सेवा प्रवाशांचा भरघोस प्रतिसाद लक्षात घेऊन नरिमन पॉईंट येथून दुपारी ३.०० आणि सायंकाळी ५.०० वाजता देखील दोन अतिरिक्त बसफे-यांच्या स्वरुपात नरिमन पॉईंट येथून सुरु झाली आणि मध्यरात्रीपर्यंत दर तासाला सदर सुविधा दररोज उपलब्ध असते.

त्यानंतर, शनिवार दिनांक २७.११.२०२१ पासून फक्त शनिवार आणि रविवार या दिवशी सकाळी ०९.३० आणि ११.०० वाजता देखील दोन अतिरिक्त बसफे-या बेस्ट उपक्रमामार्फत सुरु केल्या.

आता दिवाळीच्या सुट्टया लक्षात घेऊन प्रवाशांच्या मागणीनुसार मुंबईकरांना आणि पर्यटकांना सकाळच्या मुंबईचे दर्शन घडविण्याच्या दृष्टीकोनातून बेस्ट उपक्रमाने दिनांक २२ ऑक्टोबर २०२२ पासून सकाळी ७.०० वाजल्यापासून दर एक तासाने सदर हेरिटेज पर्यटन सेवा सुरु करण्याचे नियोजित केले आहे. यामुळे, मुंबईकर आणि पर्यटकांना यंदाची दिवाळी पहाट बेस्टच्या दुमजली बसमधून अनुभवता येईल.

पर्यटकांना तिकीट विक्रीसाठी तसेच अन्य माहितीकरिता डॉ.शामाप्रसाद मुखर्जी चौक या ठिकाणी संपर्क साधता येईल. त्याशिवाय बेस्ट उपक्रमाचा टोल फी क्रमांक १८०० २२७ ५५० आणि ०२२२४१९०११७ या दूरध्वनी क्रमांकावर देखील या पर्यटन सेवेविषयी माहिती मिळू शकेल. सदर तिकीट Book My Show App वर सुध्दा उपलब्ध आहे.

तरी, सर्व मुंबईकर जनतेने आणि पर्यटकांनी याचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

.....

Scanned with OKEN Scanner

२१३५

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मसुवराडे १९/१०/२०२२
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.५६
दिनांक : १९.१०.२०२२

## बेस्टतर्फे मुंबईकर प्रवाशांना दिवाळी बोनस

मुंबई, १९ - बेस्ट उपक्रम ही जगातील एकमेव अशी सार्वजनिक परिवहन संस्था आहे की, जी प्रवाशांच्या हिताच्या दृष्टीने कायमच नवनवीन उपक्रम राबवित असते.

त्याचप्रमाणे मुंबईकर जनता देखील बेस्ट उपक्रमाच्या सर्वच स्तुत्य उपक्रमांना भरभरुन प्रतिसाद देत असते. बेस्ट चलो मोबाईल ॲप, स्मार्ट कार्ड, एन.सी.एम.सी. कार्ड, टॅप इन टॅप आऊटसारख्या अनेक योजना देशात प्रथमच बेस्ट उपक्रमाने यशस्वीरित्या राबविल्या आहेत.

सार्वजनिक परिवहन जनमानसात अधिकाधिक लोकप्रिय करण्याकरिता बेस्ट प्रशासन नेहमीच आघाडीवर असते. विविध सणासुदीच्या काळात प्रवाशांना प्रवास सोयीचा व सुखकर व्हावा, म्हणून जादा बसगाडया बेस्टकडून चालविण्यात येतात.

त्याच धर्तीवर आता दिवाळीच्या निमित्ताने खरेदीकरिता बाजारात जाण्यासाठी बेस्टने दिवाळीच्या कालावधीत जादा बसगाडयांची व फे-यांची व्यवस्था केलेली आहे.

तसेच कोरोना महामारीच्या टाळेबंदीनंतर यंदाच्या दिवाळीतील लोकांचा खरेदीचा उत्साह पाहून बेस्ट उपक्रमाने रविवारच्या बस प्रवर्तनात १० टक्क्यांनी वाढ करण्याचे ठरविले असून एकूण ३२६ जादा बसगाडया रविवारी प्रवर्तित करण्यात येतील.

### ऑफरचा लाभ कसा घ्यावा ?

फक्त बेस्ट चलो ॲप डाऊनलोड करा आणि ॲपच्या 'बस पास' पर्यायात जाऊन ऑफर शोधा. " दिवाळी ऑफर " निवडल्यानंतर तुमचा तपशील प्रविष्ट करा आणि UPI डेबिट किंवा क्रेडिट कार्डद्वारे अथवा नेट बँकिंग इत्यादीद्वारे ९/- रु.चा ऑनलाइन भरणा प्रदान करा.

एकदा तुम्ही बसमध्ये चढल्यानंतर प्रवास सुरु करण्यासाठी मोबाईलमधील 'फेरी सुरु करा' असे बटण दाबा. प्रवास वैधतेसाठी तिकीट मशीनजवळ तुमचा फोन टॅप करा. यशस्वी वैधतेनंतर तुम्हाला ॲपवरच तुमच्या प्रवास फेरीची डिजिटल पावती मिळेल.

संपूर्ण व्यवहार हा विनारोख आणि कागदरहित असेल, सदर योजना १२ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत प्रवाशांसाठी उपलब्ध असेल.

तरी, तमाम मुंबईकर प्रवाशांनी बेस्टच्या या दिवाळी बोनसचा तसेच आपल्या कुटुंबियांसोबत यापूर्वीच जाहिर केलेल्या योजनेनुसार बेस्ट चलो ॲपद्वारे नऊ रुपयात पाच बसफे-यांच्या दिवाळी योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन बेस्ट उपक्रमाकडून करण्यात येत आहे.

......

Scanned with OKEN Scanner

२७५५

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दी करिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

28/11/2022

(मनोहर वि.गोसावी)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.५७
दिनांक : २८.११.२०२२

## बेस्ट उपक्रमातर्फे वीज ग्राहकांकरीता अतिरिक्त वीज देयके भरणा केंद्राची सुविधा उपलब्ध्द

मुंबई, २८ – वीज ग्राहकांना वीज देयकांचे प्रदान सहज व सुलभ पद्धतीने करता यावे यासाठी विविध प्रदान सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत बेस्ट उपक्रम नेहमीच प्रयत्नशील असतो. सध्या अस्तित्वात असलेल्या ठाणे जनता सहकारी बँक ५५ शाखा, कोटक महिंद्र बँक ३४ शाखा, येस बँक १५ शाखा, इंडस इंड बँक ३ शाखा, १ HDFC बँक, १ करुर वैश्य बँक आणि BBPS पुरस्कृत ४२ बँक तसेच ७ पोस्ट ऑफिस मधील वीज देयक प्रदान सुविधांव्यतिरिक्त बेस्ट उपक्रमाने **भारतीय स्टेट बँक** यांना मुंबई विभागातील त्यांच्या ५२ शाखां मधून रोख / धनादेश ,RTGS/NEFT, Direct Credit द्वारे विद्युत देयके स्वीकृतीसाठी दिनांक ०१ .१२.२०२२ पासून प्राधिकृत केले आहे. अशा प्रकारे एकूण २१० वीज देयके भरणा केंद्रांची सुविधा वीजग्राहकांकरिता उपलब्ध केली आहे. कृपया ग्राहकांनी याद्वारे वीज देयकाचे प्रदान करण्याच्या सुविधांचा लाभ घ्यावा. सदर सुविधेबाबत विस्तृत माहिती बेस्ट उपक्रमाच्या संकेत स्थळावर www.bestundertaking.com उपलब्ध करून देण्यात येईल.

---

Mumbai, 28 - BEST Undertaking always endeavour to provide better services to its esteemed consumers to pay their electricity bills. BES&T Undertaking has now authorised **State Bank of India** to accept Electricity Bill payments through Cash/Cheque, RTGS/NEFT, Direct Credit at their 52 nos. of branches located in Mumbai City from 01.12.2022. This is in addition to existing services available at 55 nos. of TJSB bank branches, 34 nos. of Kotak Mahindra Bank branches, 15 nos. of Yes Bank branches, 3 nos. of IndusInd Bank branches, 1 no. of Karur Vaisya Bank, 1 no. of HDFC Bank & 42 nos. of BBPS Enabled Banks as well as 7 nos. of Post offices. As such total 210 nos. of electricity bill collection centers have been made available for consumers. BEST consumers are requested to avail this facility to pay their electricity bills. The details of services will be made available on our website www.bestundertaking.com.

''''''''

Scanned with OKEN Scanner

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

# प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

30/11/2022

( मनोहर गोसावी)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.५८
दिनांक : ३०.११.२०२२

## बेस्ट उपक्रमाने घोषित केलेल्या नवीन विशेष बचत बसप्रवास योजना

### अधिकाधिक मुंबईकरांसाठी डिजिटल तिकीट आकर्षक बनविण्याच्या उद्देशाने नवीन योजना

मुंबई, ३० -बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) उपक्रमाने नवीन विशेष बचत बसप्रवास योजना आखल्या असून, बसप्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर आणि आरामदायी होण्याकरिता नवीन योजना आखल्या आहेत.

- १५ फे-यांकरिता ७ दिवसीय योजनेचा प्रस्ताव
- ६० फे-यांकरिता २८ दिवसीय योजनेचा प्रस्ताव
- ५० फे-यांकरिता ८४ दिवसांकरिता संपूर्ण सर्व भाडेस्तर योजनेचा प्रस्ताव

या योजनेचा एक भाग म्हणून बेस्टने अशा योजनांचा पुरेसा अवलंब न झाल्यामुळे बंद केल्या आहेत.

- ५० फे-यांकरिता १४ दिवसीय योजनेचा प्रस्ताव
- २० फे-यांकरिता ८४ दिवसीय योजनेचा प्रस्ताव

नवीन योजनेनुसार मुंबईकरांना दैनंदिन तिकीट खरेदी करताना किमान २० टक्के आणि कमाल ३४ टक्केपर्यंत सूट देण्यात येईल. सदर योजनेनुसार “बेस्ट चलो ॲप” आणि “बेस्ट चलो कार्ड” याद्वारे तिकीट काढू शकतात.

...२...

Scanned with OKEN Scanner

**सदर विशेष बचत बसप्रवास योजनेचा लाभ कसा घ्यावा**

फक्त बेस्ट चलो ॲप डाऊनलोड करा आणि नवीन योजनेद्वारे बसपास विभाग निवडा. तुमच्या आवडीनुसार योजना निवडा आणि तुमची निवड, तुमचा तपशील निवडा आणि यूपीआय द्वारे डेबिट किंवा क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग इत्यादीद्वारे ऑनलाईन प्रदान करुन योजनेचा वापर करा.

बसगाडीमध्ये प्रवेश केल्यानंतर "Start a Trip" यावर क्लिक केल्यानंतर तुमचा फोन प्रमाणित करण्यासाठी तिकीट मशिनवर टॅप करा. सदर प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाल्यावर तुम्हाला ॲपवर तुमच्या प्रवासाची डिजिटल पावती प्राप्त होईल. सदर संपूर्ण व्यवहार हा विनारोख आणि पेपर विरहित असेल.

बेस्ट चलो कार्ड वापरकर्ते प्लॅन कार्डवर कंडक्टरद्वारे लोड करु शकतात. नवीन योजना दिनांक १ डिसेंबर, २०२२ पासून चलो ॲपवर उपलब्ध होतील. बेस्ट चलो ॲप कार्ड वापरकर्ते दिनांक ३ डिसेंबर, २०२२ पासून कार्डवर योजना खरेदी करु शकतील.

३० लाखांहून अधिक वापरकर्त्यांनी बेस्ट चलो ॲप डाऊनलोड केले आहे आणि २५ टक्क्यांहून अधिक बस प्रवासी आता ते दररोज वापरतात. नोव्हेंबर महिन्यामध्ये, बेस्ट उपक्रमाने एका दिवसात ५ लाख डिजिटल ट्रिप नोंदविल्या, म्हणजेच, डिजिटल तिकीटिंग आपल्या शहरामध्ये सुरु झाल्यापासून हे प्रमाण सर्वाधिक आहे. अधिकाधिक मुंबईकरांना डिजिटल तिकिटांच्या सुविधेचा अनुभव घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी नवीन योजना आखण्यात आल्याने, बेस्ट उपक्रमाला विश्वास आहे की, ही संख्या आणखी वाढणार आहे. प्रत्येक डिजिटल ट्रिप बस प्रवाशासाठी सहज त्रासमुक्त प्रवास अनुभव देते आणि रोख हाताळणीचे प्रयत्न आणि खर्च कागदी तिकीट खर्च वाचवते.

......

Scanned with OKEN Scanner

२२६०५

संपादक / वृत्त संपादक
कृपया प्रसिध्दीकरीता सादर

मसुवराडे ६।१२।२०२२
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्रं.५९
दिनांक:०६.१२.२०२२

## अतिरिक्त अनामत रक्कम

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता आणि SoP Regulations २०२१ नुसार, सर्व विजग्राहकांनी, मागील १२ महिन्याच्या सरासरी विद्युत देयकाच्या दुप्पट रकमेएवढी अनामत रक्कम बेस्ट उपक्रमाकडे ठेवणे आवश्यक आहे. तद्नुसार, ज्या विजग्राहकांची अनामत रक्कम निर्धारीत रकमेपेक्षा कमी आहे अश्या वीजग्राहकांना बेस्ट उपक्रम मागणीपत्र पाठवीत आहे. सदर मागणीपत्र हे चालु महिन्याच्या वीज देयकासोबत पाठविण्यात येत आहे. वीजग्राहक, सदर अतिरिक्त अनामत रक्कमेचा भरणा, एकाच वेळी अथवा जास्तीत जास्त सहा हप्त्यात विनाव्याज करु शकतात. सदर अतिरिक्त अनामत रक्कम बेस्ट उपक्रमाच्या ऑनलाईन संकेत स्थळावर www.bestundertaking.net ने ऑन लाईन अथवा रोखीत किंवा डिमांड ड्रापटने बेस्ट उपक्रमाच्या वीजदेयक भरणा केंद्र / रोख भरणा केंद्रावर भरावी. ग्राहकांना, सदर अतिरिक्त अनामत रक्कम ६ समान मासिक हप्त्यात, विनाव्याज भरण्याची सवलतसुध्दा देण्यात येत आहे. बेस्ट उपक्रमाच्या वीज़ग्राहकांना, त्यांच्या नोंदणीकृत ई-मेलवर व BESTSM मार्फतच त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनीवर संदेश पाठविण्यात येत आहेत.

## Additional Security Deposit

In accordance with MERC Electricity Supply Code and SoP Regulations 2021, electricity consumers are required to maintain Security Deposit equivalent to twice of the average of last 12 months Bill Amount. In accordance with the same, BEST is sending demand notice for Additional Security Deposit to consumers, whose Security Deposit is less than as prescribed in the regulations. This notice is generated separately which is being sent along with the monthly bill. Consumer can pay the additional Security Deposit either in one go or by opting for maximum six instalments. The Additional Security Deposit may be paid Online by visiting BEST's website: www.bestundertaking.net or in Cash or DD at BEST's any Bill Payment Centre/ Cash Counter. The consumers also have option to pay Additional Security Deposit in upto 6 interest free Monthly Instalments. Kindly note that in this regard, E-mails are also being sent on registered E-mail ID and SMS will also be sent to the consumers from BESTSM on their registered mobile number.

.............

Scanned with OKEN Scanner

२२९४

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

मवराडे ९/१२/२०२२
( मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.६०
दिनांक : ०९.१२.२०२२

**सोमवारपासून बेस्ट उपक्रमाची ठाणे - वांद्रे कुर्ला संकुल दरम्यान प्रीमियम बससेवा सुरू होणार**

**बेस्ट चलो ॲपद्वारे प्रवासी आसने/जागा आरक्षित करू शकतात**

मुंबई, ९ - बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (BEST) सोमवार, दिनांक १२ डिसेंबर २०२२ पासून ठाणे ते वांद्रे कुर्ला संकुल (BKC) दरम्यान प्रीमियम बससेवा सुरू करणार आहे.

" बेस्ट चलो बस " या नावाने सुरू होणारी ही बससेवा वातानुकूलित, शून्य-उत्सर्जन असणाऱ्या सोयीस्कर आणि आरामदायी प्रवासाची खात्री देणाऱ्या चार इलेक्ट्रिक बसद्वारे सुरू केली जात आहे. या सेवेमुळे मुंबई हे सर्व-इलेक्ट्रिक प्रीमियम शहर बस सेवा असणारे भारतातील पहिले शहर असेल. ही सेवा सोमवार ते शनिवार चालविण्यात येणार असून पहिल्या टप्प्याचा एक भाग म्हणून, सदर बस एक सर्वसाधारण मार्ग आणि एक जलद मार्गावर अशी संपूर्ण दिवसभर प्रवर्तित करण्यात येईल.

**जलद बसमार्ग** - सदर बससेवा ठाणे ते वांद्रे कुर्ला संकुल दरम्यान दर प्रत्येक ३० मिनिटांच्या अंतराने सकाळी ७.०० ते सकाळी ८.३० तसेच वांद्रे कुर्ला संकुल ते ठाणे दरम्यान संध्याकाळी ५.३० ते संध्याकाळी ७.०० पर्यंत चालविण्यात येतील

**संपूर्ण दिवस बसमार्ग** - सदर बससेवा वांद्रे कुर्ला संकुल ते वांद्रे रेल्वे स्थानक मार्गावर सकाळी ८.५० ते सायंकाळी ५.५० दरम्यान आणि वांद्रे रेल्वे स्थानक ते वांद्रे कुर्ला संकुल दरम्यानच्या मार्गावर सकाळी ९.२५ ते सायंकाळी ६.२५ पर्यन्त चालविण्यात येतील.

...२

Scanned with OKEN Scanner

चलो ॲपद्वारे सदर बसमधील जागा आरक्षित केल्या जाऊ शकतात. आरक्षणावर आधारित प्रवासी असतील तरच बस बसथांब्यावर थांबेल, कमी बसथांब्यांसह जलद प्रवासाची हमी देणाऱ्या सदर बसमध्ये उभे राहून प्रवास करण्याची मुभा नाही.

**बेस्ट प्रीमियम बससेवेअंतर्गत मिळणाऱ्या सुविधा :**

- USB चार्जर आणि आरामदायी आसनांसह सर्व-इलेक्ट्रिक वातानुकूलित सेवा
- चलो ॲपद्वारे आसनांचे आरक्षण
- लाइव्ह ट्रॅकिंग सुविधा उपलब्ध असल्यामुळे तुम्ही बस पकडण्यासाठी तुमच्या बसथांब्यावर वेळेत पोहोचू शकता.
- लवचिक पुनर्नियोजन आणि आरक्षण रद्द करण्याचा पर्याय
- प्रवास सदस्यत्व घेणारे प्रवासी त्यांच्या दैनंदिन प्रवासाच्या खर्चावर ५०% पर्यंत बचत करू शकतात.

**प्रीमियम चलो बसमध्ये आसन कसे आरक्षित करावे**

फक्त बेस्ट चलो ॲप डाऊनलोड करा आणि चलो बसवर टॅप करा . बसेसच्या वेळापत्रकासह मार्ग सुचीप्राप्त करण्यासाठी स्त्रोत आणि प्रवासाच्या वेळेनुसार तुमच्या आवडीची बस निवडून गंतव्य प्रविष्ट करा.

तुम्ही एक तर प्रत्येक फेरीसाठी पैसे देऊ शकता किंवा दीर्घकालीन बसपास योजनेसह पैसे देऊन तुमचे आसन आरक्षित करू शकता.

**प्रीमियम चलो बससाठी तुमचे आरक्षण कसे प्रमाणित करावे**

एकदा तुम्ही जागा आरक्षित केल्यावर, तुम्ही ती ॲपच्या होम स्क्रीनवर, 'आगामी आरक्षित फेरी ' अंतर्गत शोधू शकता.

'टॅप टू बोर्ड' बटण दाबा आणि तुमचे आरक्षण प्रमाणित करण्यासाठी तुमचा आरक्षण आयडी शेअर करा. आता बसा आणि प्रवासाचा आनंद घ्या !

**भाडे संरचना**

**बेस्टने जाहीर केलेले दोन्ही मार्गांसाठी निश्चित केलेले एकेरी भाडे खालीलप्रमाणे :-**

- **संपूर्ण दिवस बसमार्ग : वांद्रे स्टेशन ते वांद्रे कुर्ला संकुल - रु. ५०/-**
- **जलद बसमार्ग : वांद्रे कुर्ला संकुल ते ठाणे - रु. २०५ /-**



Scanned with OKEN Scanner

**स्वागत सवलत योजना :**

अधिकाधिक मुंबईकरांना प्रीमियम बससेवेचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहीत करावे या उद्देशाने बेस्टने स्वागत सवलत योजना सुरु केली असून जी एकेरी भाड्याचा नाममात्र किमतीमध्ये ५ बसफेऱ्यांचा लाभ देते . सदर स्वागत सवलत योजना बेस्ट चलो ॲपवर थेट खरेदी करू शकता ज्याची वैधता ७ दिवसांसाठी असेल.

**प्रति फेरी किमत मार्ग सवलत**

| बसमार्ग | सवलत | प्रति फेरी किंमत |
|---|---|---|
| संपूर्ण दिवस बस मार्ग | पहिल्या ५ फेऱ्याना फक्त १०/- रु. | रु. २/- |
| जलद बस मार्ग | पहिल्या ५ फेऱ्याना फक्त १००/- रु. | रु. २०/- |

**प्रवास सदस्यता**

प्रवासी प्रवास सदस्यत्व देखील घेऊ शकतात, जे त्यांना त्यांच्या मासिक प्रवासाच्या खर्चात ५०% पर्यंत बचत करण्यात मदत करण्यासाठी आखले गेले आहेत.

**ठाणे ते वांद्रे कुर्ला संकुल**

| फेरी प्रकार | वैधता | मूळ तिकीट दर ₹ | सवलतीचे दर ₹ | लागू होणारा दर प्रति फेरी |
|---|---|---|---|---|
| १० फेऱ्या | ३० | २०५० | १४४० | १४४ |
| ३० फेऱ्या | ३० | ६१५० | ३८४० | १२८ |
| ४५ फेऱ्या | ४५ | ९२२५ | ५४४५ | १२१ |
| ९० फेऱ्या | ९० | १८४५० | ९२७० | १०३ |

**वांद्रे रेल्वे स्थानक ते वांद्रे कुर्ला संकुल**

| फेरी प्रकार | वैधता | मूळ तिकीट दर ₹ | सवलतीचे दर ₹ | लागू होणारा दर प्रति फेरी |
|---|---|---|---|---|
| १० फेऱ्या | ३० | ५०० | ३५० | ३५ |
| ३० फेऱ्या | ३० | १५०० | ९३० | ३१ |
| ४५ फेऱ्या | ४५ | २२५० | १३५० | ३० |
| ९० फेऱ्या | ९० | ४५०० | २२५० | २५ |

येत्या काही महिन्यात शहरातील गर्दीच्या बसमार्गांवर आणखी २०० प्रीमियम इलेक्ट्रिक बसेस प्रवर्तित करण्याची बेस्टची योजना असून मुंबईकर या प्रीमियम बससेवेचा जास्तीत जास्त फायदा घेऊ शकतात. ज्यामुळे हजारो मुंबईकरांना स्वतःच्या खाजगी कार तसेच कॅबपासून बेस्टच्या सार्वजनिक वाहतूक सेवेकडे वळविण्यास आणि खाजगी वाहनांना रस्त्यावरून कमी करण्यासाठी मदत होईल.

.........

Scanned with OKEN Scanner

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

( मनोज वराडे )
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.६१
दिनांक : २९.१२.२०२२

## बेस्ट उपक्रमामध्ये चालक वाहक पदांसाठी भरती असल्याबाबत अफवा

मुंबई, २९ – https://jobsanhita.com/best-driver-vahak-recruitment-2023/ या लिंकद्वारे बेस्ट उपक्रमामध्ये चालक आणि वाहक पदांच्या १२,३५० जागांकरिता महाभरती असल्याबाबत वृत्त व्हॉट्सॲप या समाज माध्यमावर व्हायरल झालेले आहे.

परंतू, सदर वृत्त खोटे असून अशा प्रकारच्या कोणत्याही भरतीबाबत बेस्ट उपक्रमाने अधिकृतरित्या कोणत्याही वृत्तपत्राला, वृत्तवाहिनीला किंवा वेब पोर्टलला काहीही कळविलेले नाही. त्यामुळे कोणीही सदर वृत्ताबाबत सत्यता पडताळून पाहिल्याशिवाय वर दिलेल्या लिंकवर विश्वास ठेवू नये असे आवाहन बेस्ट उपक्रमाकडून करण्यात येत आहे.

केवळ अशा प्रकारच्या कोणत्याही लिंकच्या आधारे कोणीही अर्ज केल्यास किंवा त्याबाबत फसवणूक झाल्यास त्याला बेस्ट उपक्रम जबाबदार असणार नाही याची सर्व जनतेने कृपया नोंद घ्यावी.

......

Scanned with OKEN Scanner

२३७५

**PRESS NOTE**

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

**प्रसिद्धी पत्रक**

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

( मनोज वराडे )
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.६२
दिनांक : २९.१२.२०२२

**३१ डिसेंबर २०२२ च्या रात्री ‘ नववर्ष स्वागतासाठी ’ मुंबईतील समुद्र किना-यांवर येणा-या जनतेच्या सोयीसाठी बेस्ट उपक्रमाच्या अतिरीक्त बसगाडया**

मुंबई, २९ - शनिवार, दिनांक ३१ डिसेंबर २०२२ च्या रात्री ‘ नववर्ष स्वागतासाठी ’ गेट वे ऑफ इंडिया, जुहू चौपाटी, गोराई बीच आणि मुंबईतील इतर समुद्र किना-यांवर रात्रीच्या वेळी येणा-या प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्ट उपक्रमाच्या वतीने विविध बसमार्गांवर रात्री एकूण ५० जादा बसगाडया सोडण्यात येणार आहेत. आवश्यकता भासल्यास अधिक प्रमाणात बसगाडया सोडण्यात येतील.

प्रवाशांच्या मदतीसाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी चौक जुहू चौपाटी, गोराई बीच तसेच चर्चगेट स्थानक (पूर्व) व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इ. ठिकाणी वाहतूक अधिकारी तसेच बसनिरीक्षकांची नेमणूक करण्यात येणार आहे.

सर्व प्रवाशांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी ‘ नववर्ष स्वागता ’ च्या निमित्ताने बेस्ट उपक्रमाने उपलब्ध केलेल्या अतिरीक्त बससेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

.....

Scanned with OKEN Scanner

| अनु. क्र. | बसमार्ग | पासून | पर्यंत | बससंख्या | प्रस्थान वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | ८ मर्यादित | डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी चौक (म्युझियम) | शिवाजी नगर टर्मिनस | ३ एकमजली | २२.००<br>२२.३०<br>२३.०० |
| २. | ६६ मर्यादित | - " - | राणी लक्ष्मीबाई चौक (सायन) | ४ एकमजली | २२.००<br>२२.३०<br>२३.००<br>२३.०० |
| ३. | ए-११६ | - " - | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | ४ एकमजली | २२.३०<br>२२.४५<br>००.१५<br>००.३० |
| ४. | ११६ | - " - | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | ४ दुमजली | १७.००<br>१७.१५<br>१७.३०<br>१७.४५ |
| ५. | ए-११२ | - " - | अहिल्याबाई होळकर चौक (चर्चगेट) | ४ एकमजली | २२.००<br>२२.३०<br>२३.००<br>२३.३० |
| ६. | ११२ | - " - | - " - | ४ दुमजली | १७.००<br>१७.१५<br>१७.३०<br>१७.४५ |
| ७. | २०३ | अंधेरी स्थानक (प) | जुहू बीच | ७ एकमजली | २३.००<br>२३.१५<br>२३.३०<br>२३.४५ |
| ८. | २३१ | सांताक्रुझ स्थानक (प.) | जुहू बस स्थानक | ५ एकमजली | २२.००<br>२२.२०<br>२२.४५<br>२३.०० |

Scanned with OKEN Scanner

| अनु. क्र. | बसमार्ग | पासून | पर्यंत | बससंख्या | प्रस्थान वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | ८ मर्यादित | डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी चौक (म्युझियम) | शिवाजी नगर टर्मिनस | ३ एकमजली | २२.००<br>२२.३०<br>२३.०० |
| २. | ६६ मर्यादित | - " - | राणी लक्ष्मीबाई चौक (सायन) | ४ एकमजली | २२.००<br>२२.३०<br>२३.००<br>२३.०० |
| ३. | ए-११६ | - " - | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | ४ एकमजली | २२.३०<br>२२.४५<br>००.१५<br>००.३० |
| ४. | ११६ | - " - | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस | ४ दुमजली | १७.००<br>१७.१५<br>१७.३०<br>१७.४५ |
| ५. | ए-११२ | - " - | अहिल्याबाई होळकर चौक (चर्चगेट) | ४ एकमजली | २२.००<br>२२.३०<br>२३.००<br>२३.३० |
| ६. | ११२ | - " - | - " - | ४ दुमजली | १७.००<br>१७.१५<br>१७.३०<br>१७.४५ |
| ७. | २०३ | अंधेरी स्थानक (प) | जुहू बीच | ७ एकमजली | २३.००<br>२३.१५<br>२३.३०<br>२३.४५ |
| ८. | २३१ | सांताक्रुझ स्थानक (प.) | जुहू बस स्थानक | ५ एकमजली | २२.००<br>२२.२०<br>२२.४५<br>२३.०० |

Scanned with OKEN Scanner

२४३५

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९. | ए-२४७<br>ए-२९४ | बोरीवली स्था.(प.)<br>गोराई बीच | गोराई बीच<br>बोरीवली स्था.(प.) | ५ एकमजली | २२.००<br>२२.१५<br>२२.३०<br>२२.४५ |
| १०. | हेरिटेज | डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी चौक<br>(म्युझियम) | विल्सन महाविद्यालय | ४ दुमजली | २३.००<br>२३.१५<br>२३.३०<br>२३.४५ |
| ११. | २७१<br><br>२७२ | मालाड स्थानक (प.)<br><br>मालाड स्थानक (प.) | मढ जेट्टी<br><br>मार्वे बीच | ४ एकमजली<br><br>२ एकमजली | २२.००<br>२२.१५<br>२२.३०<br>२२.४५<br>२३.००<br>२३.१५ |
| | | | एकूण बसेस | ५० | |

Scanned with OKEN Scanner

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२.
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

मसुकराडे 30/12/2022.
( मनोज वराडे )
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.६३
दिनांक : ३०.१२.२०२२

## नवीन वर्षाचे स्वागत बेस्टच्या खुल्या दुमजली बसमधून

मुंबई, ३० - दरवर्षी ३१ डिसेंबर रोजी मुंबईकर जनतेच्या सेवेसाठी बेस्ट उपक्रमामार्फत रात्री उशीरापर्यंत जादा बसगाडया चालविण्यात येतात.

यंदा आठवडाभर आधीच झालेली पर्यटकांची गर्दी लक्षात घेऊन बेस्ट उपक्रमाने मुंबईतील विविध भागात ३१ डिसेंबर २०२२ रोजी मागील वर्षापेक्षा दुप्पट म्हणजेच एकूण ५० जादा बसगाडया चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

परंतु, मुंबईकरांची अत्यंत लाडकी असणारी बेस्टची दुमजली बस आणि गेल्या काही वर्षापासून पर्यटकांचे आकर्षण ठरलेली बेस्टची खुली दुमजली बस प्रवाशांच्या आणि पर्यटकांच्या मागणीनुसार ३१ डिसेंबर २०२२ च्या रात्रीपासून १ जानेवारी २०२३ च्या पहाटेपर्यंत चालविण्यात येणार आहे.

त्यामुळे आता नवीन वर्षाचे स्वागत आणि नव्या वर्षाचा सूर्योदय पाहण्याची सुवर्णसंधी मुंबईकर जनता आणि पर्यटकांना बेस्टच्या खुल्या दुमजली बसमधून मिळणार आहे.

तरी जास्तीत जास्त प्रवासी आणि पर्यटकांनी या बेस्टसेवेचा लाभ आपल्या कुटुंबियांसोबत घेऊन नववर्षाचे स्वागत करावे, असे आवाहन बेस्ट उपक्रमाकडून करण्यात येत आहे.

